पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११००७

परीक्षा / बी.ए. / बी.कॉम / बी.एस्सी / ४६ दि. २१ / २ / २०१०

मा. प्राचार्य / प्राचार्या, सर्व संलग्न महाविद्यालये.
मा. संचालक / संचालिका, सर्व मान्यताप्राप्त संस्था.

विषय : अध्यादेश १६३ चा फायदा देणेबाबत....

महोदय / महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष सन २०१०-२०११ मध्ये द्वितीय / तृतीय वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान च्या लेखी परीक्षा दि.११ / ०४ / २०११, ३१ / ०३ / २०११ व २३ / ०३ / २०११ पासून सुरु होत आहेत.

प्रतिवर्षीप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील एन.एस.एस. / एन.सी.सी. च्या संदर्भात विद्यापीठ अध्यादेश १६३ चा फायदा जे विद्यार्थी घेऊ इच्छितात अशा सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणीक वर्ष २०१०-२०११ चे एन.एस.एस. / एन.सी.सी. च्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत, तसेच सदर विद्यार्थ्यांचा कायम नोंदणी क्रमांक व बैठक क्रमांक अशी सर्व माहिती असलेली यादी व त्या प्रत्येक विद्यार्थ्यामागे त्यासाठी आवश्यक असलेले शुल्क रुपये १० /- प्रमाणे जेवढे पात्र विद्यार्थी असतील तेवढयांचा एकत्रित शुल्काचा <u>डिमांड ड्राफ्ट मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे-७, यांचे नांवे वरील परीक्षा सुरु होण्यापूर्वीच विद्यापीठ कार्यालयात पाठविण्याची व्यवस्था करावी. कृपया डिमांड ड्राफ्ट वित्त विभागात जमा केल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांची यादी व अध्यादेश १६३ चे फॉर्म संबंधित परीक्षा कक्षात जमा करावेत.</u> यापुढे असेही कळविण्यात येते की, परीक्षा सुरु झाल्यानंतर कोणत्याही विद्यार्थ्याचा अशा फायद्यासाठी प्रचलीत नियमानुसार अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र. परीक्षा नियंत्रक / २७ / २०००, दि.२६ / ५ / २००० नुसार विद्यार्थ्यांचे एन.एस.एस. / एन.सी.सी. सर्टिफिकेटस् चालू शैक्षणिक वर्षाचे म्हणजे शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ चे असणे अत्यंत आवश्यक आहे. तशी सर्टिफिकेटस् नसतील तर अध्यादेश १६३ च्या ५ गुणांचा फायदा संबंधित विद्यार्थ्यांना देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी व सदर माहिती संबंधित विद्यार्थ्यांना देखील द्यावी.

अध्यादेश क्र.१६३ चे विहीत नमुन्यातील अर्ज विद्याशाखानिहाय, कायम नोंदणी क्रमांक व बैठक क्रमांक असलेली यादी व विद्याशाखानिहीय एकत्रित शुल्काचा डिमांड ड्राफ्ट सादर करणे आवश्यक आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक

विशेष सूचना :- परीक्षानिहाय वेगवगळया याद्या व विद्याशाखानिहाय स्वतंत्र डिमांड ड्राफ्ट पाठविणे गरजेचे आहे. याची नोंद घ्यावी.

प्रत माहितीसाठी :-१.सर्व उपकुलसचिव / सहा.कुलसचिव, परीक्षा विभाग.
२.विभाग प्रमुख, माहिती व व्यवस्थापन विभाग,
३. कक्षाधिकारी, परीक्षा वित्त विभाग.

S.Arts.mara / ४